एक विनम्र सत्यशोधक आणि बहुआयामी साहित्यिक

डॉ. श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय

संपादक - डॉ. नरसिंग कदम
सहसंपादक - प्रा. संजीवकुमार माने

कथासंग्रह
१) उचल
२) लगाम
बालकविता संग्रह
१) ढगाची तहान
२) श्रेष्ठ कोण : माणूस की मांजर
समीक्षा ग्रंथ
१) ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन
२) म. जोतिबा फुले: साहित्य आणि साहित्यामूल्ये
३) म. जोतिबा फुले: विचार आणि वाङ्मय
४) सत्यशोधकी साहित्य: परंपरा आणि स्वरूप
संपादित ग्रंथ
१) बळीबा पाटील
२) ढबुशास्त्री पराञ्जे
३) देशभक्त लिलासार
४) सत्यशोधकी निबंध
नवसाक्षरांसाठी पुस्तिका
१) राजर्षी शाहू महाराज
इतिहास लेखन
१) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड १
२) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड २
३) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड ३

एक विनम्र सत्यशोधक आणि बहुआयामी साहित्यिक

डॉ. श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय

संपादक – **डॉ. नरसिंग कदम**

सहसंपादक – **प्रा. संजीवकुमार माने**

ISBN - 978-93-92464-69-0

प्रभाकर पब्लिकेशन

३०४, विंग-सी, सिद्धीविनायक अपार्टमेंट,

सुतमील रोड, लातूर

मो. ८६००८८११२७, ८१४९१५३०१८

© सर्व हक्क लेखकाधीन

प्रथम आवृत्ती

१२ ऑक्टोबर २०२३

मुद्रक

पवन ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी

रोहित टायपिंग सेंटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन

विरभद्र गुळवे, लातूर

मूल्य ₹ - २५०/-

---

*सूचना : या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून लेखकाची लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत. या ग्रंथातील लेखकांच्या मताशी संपादक, सहसंपादक प्रकाशक, मुद्रक, वितरक सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

अ.क्र.	शोधनिबंध / लेखक	पृ.क्र.
१.	परिवर्तनाचे वाटसरू : डॉ. श्रीराम गुंदेकर **डॉ. गोविंद काळे**	१५
२.	ग्रामीण साहित्याचे गाढे अभ्यासक:डॉ.श्रीराम गुंदेकर **प्राचार्य, चंद्रशेखर कळसे**	२२
३.	सत्यशोधकी साहित्याच्या इतिहास लेखनातील डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे योगदान **डॉ. प्रशांत भंडे**	२९
४.	डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी इतिहास लेखन **डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले**	३६
५.	डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्य लेखन– एक आकलन **डॉ. नवनाथ पवळे**	४७
६.	सत्यशोधक डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे इतिहास लेखन **प्रा.सौ.सुनिता शिवाजी घुले**	५४
७.	सत्यशोधकी साहित्याचा इतिहास–डॉ.श्रीराम गुंदेकर लिखित खंड १ व खंड २ : सैद्धान्तिक विचारधारा **डॉ. भगवान वाघमारे**	५९
८.	'उचल' कथासंग्रहातील स्त्री प्रतिमा **प्रा. रमेश शेंडगे**	६८
९.	लगाम कथासंग्रहातील स्त्रीचित्रण **डॉ. बालाजी डिगोळे**	७१
१०.	'कुऱ्हाडीचे दांडे' मधील मूल्यभ्रष्टता आणि सत्यशोधकी दृष्टिकोन **डॉ. बिभिषण कांबळे**	७९

११.	डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे कथालेखन **प्रा. लक्ष्मण भागवत**	८४
१२.	'उचल' या कथासंग्रहातून आलेले मराठवाड्यातील दारिद्र्याचे चित्रण **डॉ. विनायक जाधव**	९१
१३.	कुऱ्हाडीचे दांडे : मूल्यभ्रष्टतेचे चित्रण **डॉ. विलास गाजरे**	९८
१४.	डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या कथेतील वास्तव दर्शन **डॉ. श्रीराम कऱ्हाळे**	१०२
१५.	श्रीराम गुंदेकरांच्या कथेतील विद्रोह **डॉ. जयदेवी पवार**	१०८
१६.	श्रीराम गुंदेकर यांच्या कथेतील ऊसतोड कामगारांचे जीवन चित्रण **डॉ. केशव आलगुले**	११४
१७.	श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्यातून आलेला सत्यशोधकीय दृष्टिकोन **डॉ. सुनिता कांबळे**	१२०
१८.	बालकांचे निसर्गाशी नाते जोडणारा बालकवितासंग्रह : ढगाची तहान **प्रा. विलास सिंदगीकर**	१२९
१९.	'ढगाची तहान' या श्रीराम गुंदेकर यांच्या बालकाव्यातील आशय सौंदर्य **डॉ. संगीता घुगे**	१३७
२०.	बाल अनुभवाची सुंदर अभिव्यक्ती: 'ढगाची तहान' **डॉ. कल्याण गोपनर**	१४५
२१.	'ढगाची तहान' मधील सत्यशोधकी विचार **डॉ. दुष्यंत शिंदे**	१५२

२२.	सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप : एक आकलन **डॉ. विष्णू लांडे**	१५८
२३.	श्रीराम गुंदेकर यांचे साहित्यदृष्टी : एक आकलन **प्रा. शिलवंत वाढवे**	१७२
२४.	'उचल' कथासंग्रहातील स्त्रीपात्रांची : कथा, व्यथा व संघर्ष **डॉ. सुरेखा बनकर**	१८२
२५.	डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या 'उचल' कथासंग्रहाचे समीक्षा लेखन **प्रा. सौ. स्वप्नाली ठाकुर**	१८७
२६.	'उचल' – एक अभ्यास **प्रा.डॉ.अर्चनादेवी पंढरीनाथ मोरे**	१९२
२७.	ग्रामीण साहित्य प्रवाहाचे शिलेदार : डॉ.श्रीराम गुंदेकर **डॉ. डी. आर. कांबळे**	१९७
२८.	डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय इतिहास लेखन **प्रा. पावडे केशव देविदासराव**	२०२
२९.	समाज परिवर्तनासाठी क्रांतीची मशाल पेटविणारा कथासंग्रह : 'लगाम' **डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे**	२०७
३०.	ओवाळणी : शिक्षण व्यवस्थेचं भयाण वास्तव **सोमनाथ विश्वनाथ गायकवाड**	२१४

✠✠✠

२२.
'सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप' : एक आकलन

डॉ. विष्णू नामदेव लांडे
मराठी विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशीम जि. वाशीम ४४४५०५
मोबाईल -९८२२३१९४१५

डॉ. श्रीराम गुंदेकर हे महाराष्ट्रातील प्रसिध्द ग्रामीण कथाकार, बालसाहित्यिक, प्रभावी विचारवंत, समीक्षक, सत्यशोधकी इतिहासकार म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांच्यावर महात्मा ज्योतीराव फुले यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधक विचारांचा मोठ्याप्रमाणात प्रभाव होता. सत्यशोधक चळवळ ही महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर पाहिजे त्या प्रमाणात विकसित होऊ शकली नाही. ही चळवळ काही बोटावर मोजण्याइतक्याच लोकांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये डॉ. श्रीराम गुंदेकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांनी 'लगाम' व 'उचल' हे दोन ग्रामीण कथासंग्रह लिहून साहित्य क्षेत्रात आपला ठसा उमटविला. त्यासोबतच 'ढगाची तहान' हा बाल कवितासंग्रह लिहून आपले बाल साहित्यिक म्हणून योगदान सिद्ध केले. त्यांनी 'ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन' हा ग्रामीण साहित्यावरील समीक्षा ग्रंथ लिहून समीक्षक म्हणूनही लौकिक मिळविला. साहित्यक्षेत्रात साहित्यिक व समीक्षक म्हणून ठसा उमटविल्यानंतरही, त्यांच्यातील सत्यशोधकी विचारवंत हा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. ते सतत सत्यशोधकी साहित्याचा अभ्यास, चिंतन, मनन करीत होते. त्यातूनच सत्यशोधकी साहित्य

हे दूर्लक्षित राहिले गेल्याची खंत त्यांना जाणवत होती. त्यामुळेच त्यांनी सत्यशोधकी साहित्य लिहिणाऱ्या लेखकांचा व त्यांच्या साहित्याचा शोध घेणे अविरत सुरू ठेवले. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र व देश पातळीवर विविध ठिकाणी अभ्यास भेटी देऊन, सत्यशोधक विचाराने प्रभावीत झालेले लेखक व त्यांचे साहित्य संकलित करण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान त्यांनी सत्यशोधक साहित्याला अनुसरून विविध ठिकाणी संमेलने व परिषदांचेही आयोजन केले. या संमेलनातून व परिषदातून त्यांनी महात्मा फुले यांचा सत्यशोधकीय विचार हा स्वत:बरोबरच विविध वक्त्यांच्या साह्याने जोरकसपणे मांडण्याचा प्रयत्न केला. यातून सत्यशोधक चळवळीला गती देण्याचाही प्रयत्न केला. सत्यशोधकीय साहित्य जस जसे त्यांना उपलब्ध होऊ लागले, तसे तसे त्यांना परंपरागत मराठी साहित्यिक व अभ्यासकांनी सत्यशोधकी साहित्याकडे कसे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केले, त्याबाबतची सल निर्माण होऊ लागली. यातूनच त्यांची चिकित्सक व संशोधक वृत्ती वाढत गेली. मराठीतील परंपरागत साहित्यिक, अभ्यासक व समीक्षकांनी सत्यशोधकीय साहित्याकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केल्याने, त्यांनी या साहित्याला योग्य तो न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू ठेवला. त्यामुळेच त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे मराठी संशोधन केंद्र सुरू केले. या संशोधन केंद्राच्यामार्फत त्यांनी युजीसी नई दिल्ली यांच्याकडून सत्यशोधक साहित्याचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी मेजर रिसर्च प्रोजेक्ट मिळवून घेतला. त्यातूनही त्यांनी मोठ्याप्रमाणात सत्यशोधकीय साहित्याचे संकलन व संशोधन केले. प्रस्तुत संशोधन केंद्रात मला काही दिवस प्रत्यक्ष काम करता आले, त्यामुळे मला डॉ. श्रीराम गुंदेकर हे व्यक्तिमत्व जवळून अनुभवता आले. मी त्यांच्या सान्निध्यात असताना व पुढेचालून त्यांचे समीक्षात्मक साहित्य वाचून मला जे काही आकलन झाले, त्याबाबतचा परामर्श प्रस्तुत लेखातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी 'सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप' हा समीक्षा ग्रंथ लिहिला. यातून त्यांनी सत्यशोधकीय साहित्य परंपरेची विस्ताराने चिकित्सा केली. या ग्रंथात त्यांनी 'सत्यशोधकी साहित्य

: परंपरा आणि स्वरूप', 'मराठी साहित्यावर सत्यशोधकी साहित्याचा प्रभाव', 'सत्यशोधकी साहित्य आणि जनसाहित्य : काही अनुबंध', 'महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्रीमुक्तिविषयक विचार', 'ताराबाई शिंदे यांचा स्त्री-पुरूष समतेचा विचार', 'सावित्रीबाई फुले यांची काव्यरचना', 'बळीबा पाटील : पहिली स्वतंत्र सामाजिक ग्रामीण कादंबरी', 'ढङ्काशास्त्री परान्ने : पहिली मराठी विनोदी कादंबरी', 'कुलकर्णी लीलामृत: उच्चवर्णियांच्या स्वार्थांधतेचे भेदक चित्रण' व 'सार्वजनिक सत्यधर्म : इहवादी विचार' असे विविध विषयावरील दहा लेख लिहून सत्यशोधकी साहित्याची परंपरा व स्वरूप विस्ताराने विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

यातील 'सत्यशोधकी साहित्य: परंपरा आणि स्वरूप' या लेखातून त्यांनी सत्यशोधकीय साहित्याला प्राचीन परंपरा लाभली असल्याचे नमूद केले. या परंपरेत कधी सातत्य असलेले दिसते, तर कधी कधी या परंपरेत काहीसा खंडही पडलेला दिसतो. म. फुले यांनी १८५३ मध्ये 'निर्मिकाचा शोध' हे चार पानी पद्य लिहिले, त्यानंतर त्यांनी १८५४ मध्ये 'मनुस्मृतीचा धि:क्कार' हा पाच ते सहा पानी निबंध लिहिला. या निबंधाला म. फुले यांनी चोपड्याच्या, लहान पुस्तिकेच्या रूपाने छापून, सत्यशोधकीय विचार खऱ्याअर्थाने लोकांपर्यत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. १८५५ पासून म. फुले यांनी आपले लेखन विस्ताराने असे सुरू केले. पुढेचालून महात्मा फुले यांनी २४ सप्टे. १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करून, सत्यशोधकीय साहित्याला एकप्रकारे पाठबळ दिले. त्यातच म. फुले यांनी सत्यशोधनाच्या तळमळीतून १८८९ मध्ये 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहिला. याचबरोबरच त्यांनी 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड' यासारख्या ग्रंथाची निर्मिती करून, सत्यशोधकीय साहित्याची व विचारांची चळवळ अधिक प्रगल्भ केली. म. फुल्यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून ही चळवळ पुढे नेल्याचे दिसते. त्यांनी 'छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा' लिहून या चळवळीच्या प्रसार व प्रचारासाठी एक लोकप्रिय व वेगळा असा रचनाप्रकार उपलब्ध करून दिला. यासोबतच त्यांनी पदे, कटाव, अभंग, अखंड लिहूनही सत्यशोधकीय साहित्य परंपरेचा

विविधांगी विस्तार करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी सुरू केलेला हा सत्यशोधनाचा विचार हा त्यांच्यापुरताच न थांबता, पुढेचालून या चळवळीला अनेक अनुयायी प्राप्त झाले. सावित्रीबाई फुले यांनी ही या चळवळीला गतिमान करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी 'काव्यफुले', 'बावनकशी सुबोध रत्नाकर' यासारखे काव्यग्रंथ लिहून सत्यशोधनाच्या साहित्याची चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूरच्या छत्रपती राजर्षी शाहू यांच्या वेदोक्त प्रकरणानंतर दै. केसरी व इतर वर्तमानपत्रातून सत्यशोधकीय विचारावर मोठ्याप्रमाणात टीका केल्या जाऊ लागली. पुढेचालून यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये स्वातंत्र्यविषयक चळवळ आणि सत्यशोधक चळवळीचा विचार यांच्यातील व्दंव्द चित्रीत केले. मराठवाड्यात निजामाच्या राजवटीत सत्यशोधक समाजाच्या स्थापनेला बंदी घातली होती. तरीही मराठवाड्यात अनेकांनी सत्यशोधकीय परंपरेचा वारसा चालविण्याचे प्रयत्न केले. त्यातच शाहीर दिलीप वायसे यांनी आपल्या जलशातून हा विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. या जलशांसाठी बनसोडे गुरूजींनी अनेक पदे लिहून दिली. या चळवळीचा वारसा अनेकांनी चालविल्यामुळेच, सत्यशोधकीय साहित्य परंपरा ही शंभर पेक्षा जास्त वर्षापासून टिकून असल्याचे दिसून येते. या चळवळीत सहभागी झालेले अनुयायी हे सर्वच स्तरातील आढळतात. त्यामध्ये सवर्ण– अवर्ण यांचाही समावेश होतो. खासकरून या चळवळीत अनेक स्त्रियांचाही वाटा राहिल्याचे प्रकर्षाने जाणवते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधनाचा विचार कुष्णराव भालेकर यांनीही चालविला. त्यांनी शूदांसाठी 'निराश्रित हिंदू' असा शब्दप्रयोग योजिला असल्याचे दिसून येते. त्यांनी 'बळीबा पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी लिहून, त्यामध्ये तत्कालीन काळातील ग्रामीण माणूस, रीतिरिवाज, स्त्री मुक्तीचे विचार, अस्पृश्यांचे स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. पुढेचालून ताराबाई शिंदे यांनी त्यांच्या 'स्त्री–पुरूष तुलना' या निबंधातूनही सत्यशोधकीय विचारधारा पुढे नेण्याचा प्रयत्न केला. या निबंधातून त्यांनी स्त्री मुक्तीविषयक विचार निर्भिडपणे मांडण्याचा प्रयत्न केला. पुढेचालून सत्यशोधकीय साहित्य लेखनाच्या परंपरेत

मुकुंदराव पाटील यांनी भर टाकली. त्यांनी 'कुलकर्णी लीलामृत', 'शेटजी प्रताप', 'देशभक्त लीलामृत' यासारख्या ओवीबध्द दीर्घ व खंड काव्यातून भट, ब्राह्मण, मारवाडी, पुढारी हे समाजाचे शोषण कसे करतात, त्यावर विस्ताराने भाष्य केले आहे. यासोबतच 'ढङ्कशास्त्री परान्ने' ही त्यांची विनोदी कादंबरी ही सत्यशोधकीय साहित्य परंपरेला विकसित करताना दिसून येते. हाच विचार पुढे नेण्यासाठी त्यांनी 'दीनमित्र' हे साप्ताहिक सुरू केले, त्यातील एकूणच लेख हे या विचारधारेला अधिक प्रगल्भ करताना दिसून येतात. दिनकरराव जवळकर यांनी 'छत्रपती पद्यसंग्रह', 'देशाचे दुश्मन', 'मर्दहो, 'नाके कापून घ्या!' यासारख्या पुस्तकांचे लिखाण करून वर्चस्ववादी व्यवस्थेचा जळजळीत अशा शब्दात समाचार घेतलेला दिसून येतो. याचकाळात भास्करराव जाधव यांनीही सत्यशोधकीय साहित्य परंपरेला समृध्द करण्याचा प्रयत्न केला. भगवंतराव पाळेकर यांनी 'जागृती' हे पत्र चालून समतोल अशा विचाराची मांडणी केली. भाई माधवराव बागल यांनीही मोठ्याप्रमाणात ग्रंथरचना करून सत्यशोधन साहित्य परंपरेस बळकट केलेले दिसून येते. याचबरोबर रा. ना. चव्हाण, शास्त्री नारो बाबाजी, गजाननराव फुले, यशवंतराव फुले, पंढरीनाथ पाटील, तुकाराम तात्या पडवळ, धोडिंराम कुंभार, गोपाळबाबा वलंगकर, तान्हुबाई बिर्जे यासारख्या कितीतरी व्यक्तींनी ही चळवळ समृध्द केल्याची मांडणी डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी या लेखातून चित्रीत करण्याचा प्रयत्न केलेला आढळून येतो.

या ग्रंथातील दुसरा लेख हा 'मराठी साहित्यावर सत्यशोधकी साहित्याचा प्रभाव' असा आहे. प्रस्तुत लेखातून त्यांनी सत्यशोधकीय साहित्याची तात्विक मांडणी करण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मणी व्यवस्थेने निर्माण केलेल्या सर्व पुराणकथा फक्त ब्राह्मण वर्णाचे हितसंबंध जोपासणाऱ्या आहेत. ब्राह्मणी धर्म ही इतरांना गुलामगिरीत ठेवणारी व्यवस्था असल्याचे त्यांना स्पष्टपणे वाटते.(पृ.१९) त्यामुळेच समाजाला सार्वजनिक सत्यधर्माची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. यामध्ये त्यांनी सत्यशोधकीय साहित्याची परंपरा ही नांगरी असल्याचे प्रतिपादन केले. सोबतच सत्यशोधक परंपरेचा प्रवाह हा कुण्याही जाती-धर्माशी निगडित नसून, ती एक सर्वसामावेशक

परंपरा असल्याचे त्यांना वाटते. सत्यशोधक चळवळ ही मानवी जीवनाच्या सर्वांगाना आणि सर्व पैलूंना स्पर्श करणारी चळवळ असल्याचेही (पृ. २२) त्यांनी सूचित केले. या परंपरेतील साहित्यिकांनी साहित्याकडे मनोरंजन म्हणून न पाहता गंभीरपणे पाहिलेले दिसते, असाही युक्तिवाद त्यांनी केलेला आहे. यासोबतच मराठी साहित्य क्षेत्रातील अनंत काणेकर, श्री. रा. टिकेकर, वि. स.खांडेकर, ग.त्र्यं. माडखोलकर, भा.वि. वरेरकर, वि.वा.शिरवाडकर यांच्या लेखनावर सत्यशोधकी विचाराचा प्रभाव असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

या ग्रंथातील तिसरा लेख हा 'सत्यशोधकी साहित्य आणि जनसाहित्य: काही अनुबंध' असा आहे. या लेखातून सत्यशोधकी साहित्य आणि जनसाहित्य या मराठीतील दोन वेगवेगळ्या साहित्य प्रवाहातील अनुबंध विशद करण्याचा प्रयत्न झाला. सत्यशोधकी साहित्य हा प्रवाह महात्मा फुले यांनी निर्माण केला, तर अलीकडील काळात जनसाहित्य हा नवा प्रवाह डॉ. सुदाम सावरकर यांनी नावारूपास आणला. जनसाहित्य हे समाजजीवनातील गतिशीलता आणि परिवर्तन याकडे दूर्लक्ष करीत नसल्याने, हे साहित्य परिवर्तनवादी साहित्य चळवळीचाच एक भाग म्हणून संबोधल्या गेले आहे. समाजाची गुलामगिरीतून, शोषणातून मुक्तता हेच सत्यशोधक साहित्याचे सूत्र असलेले दिसून येते. अशीच काहीशी मांडणी जनसाहित्यातूनही अभिप्रेत असल्याची मांडणी केली आहे.

या पुस्तकात 'म.ज्योतिबा फुले यांचे स्त्रीमुक्तीविषयक विचार' असा एक लेख आहे. ज्यातून महात्मा फुले यांच्या स्त्री मुक्तीविषयक विचारांची सविस्तर अशी चिकित्सा लेखकाने केलेली दिसून येते. तत्कालीन काळात महात्मा फुले हे स्त्री-शूद्रांची प्रगती झाल्याशिवाय राष्ट्राची प्रगती होणार नाही हे जाणून होते. त्यासाठी त्यांनी हे दोन्हीही घटक शिक्षीत झाले पाहिजेत अशी आग्रही भूमिका मांडली. म. फुले यांनी हे त्यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकातील विविध प्रसंगातून पटवून देण्याचा प्रयत्न केला. या नाटकाविषयी डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी त्यांच्या ग्रंथातून ''तृतीयरत्न नाटकाने शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांच्या जागृतीची नांदी निर्माण केली'' असल्याची (पृ.

३९) स्पष्ट भावना अधोरेखित केली आहे. महात्मा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जो पोवाडा लिहिला, त्यातूनही त्यांनी स्त्रीमुक्तीविषयक विचार कसे मांडले तेही सोदाहरण पटवून देण्याचा प्रयत्न केला. म. फुले यांनी 'ब्राह्मणाचे कसब' या ग्रंथातून भट-ब्राह्मण हे शेतकऱ्यांचे कसे हाल करतात, त्याचे चित्रण केले आहे. त्यामुळेच महात्मा फुले हे याविषयी इंग्लडची राणी व्हिक्टोरियालाही स्पष्टपणे जाब विचारताना दिसतात. ब्राह्मणाच्या कसबामुळे शेतकऱ्यांबरोबरच स्त्रियांचेही कसे हाल होतात, तेही म. फुले यांनी सूचित करण्याचा प्रयत्न केल्याचे लेखकाने दर्शविले आहे. 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म. फुले यांनी परशुरामाने पृथ्वी ही नि:क्षत्रीय करण्याच्या नादात क्षत्रिय आणि ब्राह्मण स्त्रियांचा अमर्याद छळ केला हेही प्रस्तुत ग्रंथातून अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. उच्चवर्णिय व्यवस्था ही सामान्य जनतेचे व स्त्रियांचे शोषण कसे करीत असे, त्याविषयी त्यांनी या ग्रंथात महात्मा फुले यांनी दिलेल्या विविध उदाहरणांचा परामर्श घेतलेला आहे. स्त्रियांना पुनर्विवाह करण्याची संधी नसल्याने, त्यांच्याकडून व्यभिचार, गर्भपात, बालहत्येसारख्या घटना घडू लागल्या. या प्रश्नांकडे महात्मा फुले यांनी आपले जातीने लक्ष घातले. त्यातून त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. एवढेच नव्हे तर तत्कालीन काळातील स्त्रियांच्या जीवनातील सतीची प्रथा, केशवपन यासारख्या वाईट प्रथांवरही महात्मा फुले यांनी कसा भर दिला होता, ते लेखकाने सोदाहरण पटवून देण्याचा प्रयत्न केला. याच ग्रंथातून महात्मा फुले यांनी सत्यशोधकीय पध्दतीने विवाह लावावेत, यासाठी आग्रही अशी भूमिका मांडली. फुल्यांची ही भूमिका प्रस्तुत लेखकाने आपल्या ग्रंथातून सविस्तर विशद करण्याचा प्रयत्न केला. सोबतच समाज जीवनात वावरत असताना तिचे काटेकोरपणे पालनही करण्यावर भर दिला. म. फुल्यांनी सांगितल्यानुसार त्यांचे अनेक अनुयायी हे सत्यशोधकीय पध्दतीने विवाह करू लागले. अशा अनेक अनुयायांना परंपरागत समाज व्यवस्थेकडून त्रास झाल्याचीही उदाहरणे आढळून येतात. ज्यामध्ये ग्यानोबा ससाणे व काशीबाई यांच्या लग्नाच्या वेळी पोलिस बंदोबस्त मागवून त्यांचा विवाह करावा लागला असल्याची स्पष्ट नोंद

लेखकाने केली. सत्यशोधकीय विवाह परंपेरेने लग्नासाठी पुरोहित नाकारले, त्यांची दक्षिणा नाकारली, रूढी-परंपरा, रीतिरिवाज नाकारले, त्यामुळेच लग्नातील अनाठायी खर्च कमी झाला. हा बचत केलेला अनाठायी खर्च अनेकांनी समाजउपयोगी कामाकडे वळविला. यातूनच एक आदर्श समाजासमोर उभा राहू शकला. याबरोबरच महात्मा फुले यांनी तत्कालीन काळात देव व धर्माच्या नावाखाली स्त्रियांच्या देहाचा कसा वापर केला जात होता, त्यावरही विस्ताराने मांडणी केली, ती मांडणीही लेखकाने निर्भिडपणे प्रस्तुत ग्रंथातून उजागर करण्याचा प्रयत्न केला. यासोबतच तत्कालीन काळातील भट-ब्राह्मण, शास्त्री-पंडित हे व्यभिचारी कसे होते तेही महात्मा फुल्यांच्या विविध ग्रंथाच्या आधारे सप्रमाण पटवून देण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर विषयलंपट असलेल्या पुराणिकांनी, पुराणात विषयलंपटच कथा घुसडून देण्याचा कसा प्रयत्न केला आहे, त्यावरही विस्ताराने भाष्य केलेले दिसून येते. या लेखाच्या शेवटी अखेरीस निष्कर्षवजा मांडणी लेखकाने केली. या निष्कर्षातून त्यांनी महात्मा फुले यांना तत्कालीन काळात वर्णजातिव्यवस्थेला विरोध करावयाचा होता, समाजात त्यांना कोणत्याही प्रकारची विषमता नको होती, स्त्री-पुरूष समानता हवी होती, असे प्रतिपादन केलेले दिसून येते.

प्रस्तुत लेखकाने 'ताराबाई शिंदे यांचा स्त्री- पुरूष समतेचा विचार' या लेखातून ताराबाई शिंदे यांच्या स्त्री-पुरूष समानतेच्या विचारावर विस्ताराने भाष्य केले. ताराबाई शिंदे यांनी इ.स. १८८२ मध्ये 'स्त्री-पुरूष तुलना' हा निबंध लिहून स्त्रियांच्या समस्यांवर प्रकाशझोत टाकला. स्त्रियांच्या दु:खाला, उपेक्षेला पुरूषप्रधान मानसिकताच जबाबदार असल्याचे त्यांनी निक्षूण सांगितले. ताराबाई शिंदे यांचे या निबंधातील विचार हे प्रस्तुत लेखकाला बुध्दिवादी, तर्कसंगत, संयमी, समतोल, सडेतोड असे वाटतात. या निबंधावर प्रकाशझोत टाकताना त्यांनी सुरूवातीलाच तत्कालीन परिस्थितीवर विस्ताराने भाष्य केले. ज्यामध्ये या काळात इंग्रजी शिक्षण सुरू झाले होते, इंग्रजानी कायदे, न्यायालये करून सर्व जातींना समान मानले होते, पेशवाईतील मनुस्मृतीचे कायदे रद्द झाले होते, इहवादी दृष्टिकोन समाजात रूजला होता, वर्तमानपत्रे-ग्रंथनिर्मितीचा हा काळ होता. देशीपणा सोडून इंग्रज स्त्री-

पुरूषांचे अनुकरण समाजात सुरू होते यासारखी तत्कालीन काळात परिस्थिती असल्याचे नमूद केले आहे. अशा काळात ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री- पुरूष तुलना' हा निबंध लिहून मोठे धाडसी कार्य केले. या निबंधातून ताराबाई शिंदे यांना पतिव्रता धर्म मान्य असल्याचे ते स्पष्ट करतात, परंतु त्यांना धर्मनियमांचा अतिरेक मात्र त्यांना नको वाटत होता. त्यांना स्त्री-पुरूष समतेची अपेक्षा होती. पुरूष हे स्त्रियांसमवेत चांगले वर्तन करीत नसल्याने, याबाबत पुरूषांना देवांनीच चांगली सदबुध्दी द्यावी. देवही पुरूषांचीच बाजू घेत असल्याने तो पक्षपात असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. ताराबाईंनी आपल्या निबंधातून रामायण, महाभारत, पुराणे यातील विविध उदाहरणे देऊन, त्यातील पुरूषांचा धूर्तपणा, कपटीपणा, कावेबाजपणा, दगाबाजपणा, विश्वासघातकीपणा सिध्द केला, प्रौढविवाह, पुनर्विवाहाचाही पुरस्कार केला. त्यांनी आपल्या निबंधातून तत्कालीन सामाजिक व आर्थिक वस्तुस्थितीवरही प्रकाश टाकला. स्त्रियांची निंदा करणाऱ्या तत्कालीन नाटककारांवर त्यांनी कडाडून टीका केली. ताराबाई शिंदे यांनी त्यांच्या निबंधातून अमर्याद पुरूषी सत्तेला विरोध, पुरूषांच्या मनमानी वर्तनाला विरोध, स्त्री-पुरूषांच्या स्वैराचाराला विरोध, पोथ्या-पुराणातील शृंगारिक वर्णनास विरोध, इंग्रजी संस्कृतीच्या भ्रष्ट्र अनुकरणाला विरोध केला असल्याचे या लेखातून लेखकाने स्पष्ट केले. ताराबाई शिंदे यांच्या निबंधाची समीक्षा करीत असताना, लेखकाला ताराबाईवर पारंपरिक संस्काराचा प्रभाव असल्याचे वाटते. त्यामुळेच ईश्वर, दैव, परलोक यावर त्यांचा विश्वास असल्याचे सांगून त्यांच्या लेखनाच्या काहीप्रमाणात मर्यादाही सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ताराबाईच्या लिखाणावर लेखकाने टीका जरी केलेली असली तरीसुध्दा, स्त्री मुक्तीच्या विचारांचा प्रारंभबिंदू हा म. फुले आणि ताराबाई शिंदे यांच्यापासून सुरू होत असल्याची मांडणी केलेली दिसते. एवढेच नव्हे तर साठोत्तरी काळात उदयास येत असलेल्या एकूणच मराठीतील विविध साहित्य प्रवाहांनीसुध्दा, ताराबाई शिंदे यांचे विचार समजून घेतले पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी आपले विचार मांडलेले दिसून येतात.

लेखकाने 'सावित्रीबाई फुले यांची काव्यरचना' या लेखातून,

सावित्रीबाई फुले यांच्या काव्यरचनेचा विस्ताराने परामर्श घेतला आहे. या लेखातून सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वाचा व लेखनाचा विचार महात्मा फुले यांच्या संदर्भातच केला जात असला तरी, सावित्रीबाई फुले या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या कर्तृत्ववान कार्यकर्त्या आणि कृतिशील लेखिका असल्याचे सुरूवातीलाच अधोरेखित केले. सावित्रीबाई फुले यांच्या काव्यरचनेमुळे आधुनिक मराठी कवियत्रींच्या परंपरेचा प्रारंभकाळ हा त्यांच्यापासून मानला जावा अशी स्पष्ट भूमिकाही त्यांनी मांडलेली आहे. या लेखातून सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' या दोन्हीही काव्यग्रंथाची व त्यातील एकूणच कवितांची विस्ताराने चिकीत्सा केली. सावित्रीबाईच्या काही कवितेतून शिवभक्ती, शिवस्तुती, शिवप्रार्थना येत असल्याने, त्या शिवभक्त असल्या तरी त्यांचे कार्यकर्तृत्व हे मात्र कमी लेखता येत नसल्याची स्पष्ट भावना त्यांनी व्यक्त केली. शिवभक्ती ही परंपरा त्यांच्यासाठी अडथळा न ठरता, त्यांच्या कार्याला प्रेरक, बलदायकच ठरली असल्याचे सूचित केले. सावित्रीबाई फुले यांच्या काही कवितेच्या बाबत मात्र, काही लोकांनी मुद्दामहून त्यांच्या कवितेत काही मजकूर घुसडविला असल्याची शक्यता वर्तविली आहे. याबाबत भाषाअभ्यासकांनी मात्र त्याबाबतचे सत्य तपासून पुढे आणावे असे आवाहनही केलेले दिसून येते. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेत सामाजिक जाणिवा, आत्माविष्कार, शैली, लोकाभिमुखता असल्याने, स्त्रीवादी साहित्याचा प्रारंभ हा सावित्राबाईपासूनच मानल्या जावा असा युक्तिवाद त्यांनी केलेला दिसून येतो.

'बळीबा पाटील : पहिली स्वतंत्र सामाजिक ग्रामीण कादंबरी' या लेखातून त्यांनी कृष्णराव भालेकर यांच्या बळीबा पाटील या कादंबरीची सांगोपांग अशी चिकित्सा केली. या लेखाच्या सुरूवातीलाच बळीबा पाटील या कादंबरीसारख्या सत्यशोधकीय विचारधारेतून निर्माण झालेल्या साहित्याकडे, मराठी साहित्याने नेहमीच दूर्लक्ष केले असल्याची खंत व्यक्त केली. त्यामुळे भारतातील सर्व इतिहासाचे पुनर्लेखन हे जननिष्ठ दृष्टीतून होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी नोंदविले. एकीकडे भारतीय इतिहासकारांनी १८५७ च्या उठावाकडे 'स्वातंत्र्य युध्द' म्हणून पाहिले हे खरे, परंतु दुसरीकडे १८७३ मध्ये सुरू

झालेल्या सत्यशोधकीय चळवळीकडे 'मानवमुक्तीची चळवळ' म्हणून पाहणे गरजेचे होते, परंतु असे मात्र झाले नाही. उलट या चळवळीचा साधा उल्लेखही केला जात नसल्याची खंत व्यक्त केलेली दिसून येते. ज्या काळातील महाराष्ट्रातील राज्य, धर्म व सांस्कृतिक सत्ता ही उच्चवर्णियांच्या हातात होती, त्याचकळात सत्यशोधक मंडळी ही त्या व्यवस्थेच्याविरोधात संघर्ष करीत होती. अशाच काळात ही कादबंरी लिहिल्या गेली. या कादंबरीतील बळीबा पाटलाला सृष्टीचा निर्माता कोणीतरी आदिकारण असावा असे वाटते. त्यांचे हे विचार महात्मा फुले यांच्या निर्मिक या संकल्पनेशी जुळतात. पुढेचालून हाच बळीबा पाटील आपण अद्यापपर्यंत जनावरासारखे जगलो, परंतु आता मात्र तसे जगणार नसल्याचे स्पष्ट करतो. त्याची ही भूमिका उच्चवर्णीय वा वचर्स्ववादी व्यवस्थेला विरोध करणारी असल्याचे दिसते. त्यामुळे या कादंबरीतून आत्मबळ, आत्मप्रतिमा, अस्मिता, स्वावलंबन आणि स्वातंत्र्य ही सूत्र अधोरेखित झाली असल्याचे लेखकाने सूचित केले आहे. या कादंबरीतून बळीबा पाटील हा विषमताधिष्ठित, उच्च-नीच भेदभावाचे पोषण करणारी, अन्यायी क्रूर व्यवस्था नाकारतो. तर न्यायाचे राज्य निर्माण करणारी व्यवस्था तो अपेक्षितो. बळीबा पाटलाच्या गावातील कळलाव्या कुलकर्णी(मोरोपंत घरफोडे) हा आपल्या जाणव्याच्या व लेखणीच्या बळीवर जनतेला धाकात ठेवतो. त्यामुळे तो पाटलालाही भीत नाही. अशावेळी बळीबा मात्र त्याच्या धाकाची पर्वा न करता, त्यालाच ''तू माझा नोकर आहेस...तू कोणत्याही खटल्यात जास्त बोलत जाऊ नकोस...'' असे स्पष्टपणे निक्षून सांगताना दिसून येतो.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी या पुस्तकात 'ढढ्ढाशास्त्री परान्ने : पहिली मराठी विडंबनात्मक कादंबरी' या लेखातून मुकुंदराव पाटलांची 'ढढ्ढाशास्त्री परान्ने यांचे वैकुंठाहून मृत्युलोकी पुनरागमन' ही मराठीतील पहिली विडंबनात्मक कादंबरी असल्याचे सिध्द केले आहे. या कादंबरीतील ढढ्ढाशास्त्री हे सनातनी कर्मठ ब्राह्मणांचे प्रतिनिधित्व करताना दिसून येतात. त्यांना आपल्या परान्ने कुळाच्या कर्मठपणाचा अभिमान आहे. त्यांना पृथ्वीवर मिळणाऱ्या सोयी-सवलतीमुळे देवापेक्षाही माणूस श्रेष्ठ वाटायला लागतो. यातूनच मुकुंदराव

पाटलाच्या विडंबनात्मक शैलीवर लेखकाने प्रकाश टाकलेला दिसून येतो. तत्कालीन उच्चवर्णियांनी बहुजन समाजासाठी उपयुक्त ठरतील अशा समाजसुधारणांचा स्वीकार केला नाही. या कादंबरीत पानरंगेशास्त्री हे म्लेंछ, यवन अशा नीच मनुष्याचा स्पर्श झालेला हुक्का पितात, हे कृत्य पाहून ढढ्ढाशास्त्री यांना धर्माची होळी केल्यासारखे कृत्य वाटते. ढढ्ढाशास्त्री हे स्त्रियांकडे फक्त भोगदासी म्हणूनच पाहताना दिसतात. या कादंबरीतून मुकंदराव पाटील यांनी वर्चस्ववादी, विषमतावादी मनोवृत्तीचे दर्शन घडविले आहे, त्याचा विस्ताराने उहापोह लेखकाने करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'कुलकर्णी लीलामृत : उच्चवर्णियांच्या स्वार्थांधतेचे भेदक चित्रण' या लेखातून मुकुंदराव पाटील यांच्या कुलकर्णी लीलामृत मधून उच्चवर्णियांच्या स्वार्थांधतेचे चित्रण कसे आले आहे, त्यावर लेखकाने विस्ताराने भाष्य केले. मुकुंदराव पाटील यांनी भटजी, शेटजी यांच्या दास्यातून मुक्त होण्याची शिकवण या ग्रंथातून उपरोधिक स्वरूपात कशी दिली आहे, त्यावर लेखकाने विस्ताराने भाष्य केलेले दिसून येते.

या ग्रंथातील शेवटचा लेख 'सार्वजनिक सत्यधर्म इहवादी विचार' या लेखातून महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातील इहवादी विचारावर विस्तृतपणे प्रकाश टाकला आहे. या लेखाच्या सुरूवातीलाच धर्म म्हणजे काय याबाबतची चर्चा केलेली दिसते. परंपरागत व्यवस्थेत लाचारपणा, निरूपाय, हातचलाखी, व्दैष, सूड उगविणे, दगेबाजी करणे, ठकबाजी करणे, कावेबाजी करणे, इतरांना हलके व पवित्र मानणे याला धर्म माणण्याची जी पध्दत होती, ती पध्दत म. फुले यांनी आपल्या ग्रंथातून चुकीची ठरविली. अनेक धर्मगुरूंनी, धर्मातून आपल्या पोटाची सोय कशी लावता येईल याकडेच लक्ष दिले. त्यातूनच शूद्रातिशूद्रांना विद्या न देणे, पराजित लोकांना फसवणे, अज्ञानी लोकांकडून लाच घेणे, अनाचार करून सोवळे-ओवळे परिधान करणे यासारख्या कृतीला त्यांनी धर्म म्हणण्यास स्पष्टपणे विरोध केला. धर्माचे नियम करणारे लोक हे स्वार्थी, आपमतलबी, पूर्वग्रहदूषित, कपटी, संकुचित विचाराचे असल्याचेही म. फुले यांनी स्पष्ट केले. कोणत्याही धर्मातून सर्वांचे कल्याण व्हावे असे म. फुल्यांना वाटत

असल्याची मांडणी लेखकाने केली आहे.

डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या 'सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप' या समीक्षा ग्रंथावरून असे निदर्शनास येते की, या ग्रंथातून सत्यशोधकीय साहित्य प्रवाहाची उकल होण्यास मदत होते. सत्यशोधकीय साहित्य प्रवाहातील कोणत्याही लेखकाचे किंवा कोणत्याही सत्यशोधकीय वाङ्मय प्रकाराचे संशोधन करणाऱ्या अभ्यासक, संशोधकासाठी हा ग्रंथ नेहमीच मार्गदर्शक ठरणारा असा आहे. या ग्रंथातील एकूणच लेखांचे लेखन करताना लेखकाने, महात्मा फुले यांनी निर्माण केलेली सत्यशोधकीय विचारधारा नजरेसमोर ठेऊन रचना केली. प्रस्तुत ग्रंथातून सत्यशोधकीय साहित्याची परंपरा प्राचीन असल्याचे लेखकाने सिध्द केले. परंतु या परंपरेमध्ये सातत्य न आढळता बऱ्याचदा खंड पडल्याचेही दिसून येते. माणसातील माणूसपणा सिध्द करणारी ही चळवळ असल्याचे दिसून येते. या चळवळीने कोणाचा द्वैष न करता, नेहमीच स्वातंत्र्य, समता, बंधूता, मानवता, स्त्री-पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोणाला महत्व दिले. देव, पोथी-पुराण यासारख्या कपोलककल्पित गोष्टीला महत्व दिले नाही. सत्यशोधकीय साहित्याचे लेखन मोठ्याप्रमाणात विविध लेखकांनी केले. त्यांनी साहित्यातील वेगवेगळ्या रचना प्रकारांतूनही लिखाण करण्याचा प्रयत्न केला. एकूणच सत्यशोधकीय साहित्य हे आशय व रचनाप्रकाराच्यादृष्टीने समृध्द असतानाही, परंपरागत मराठीतील साहित्यिक, अभ्यासक व समीक्षकांनी मात्र जाणीवपूर्वक या प्रवाहाकडे दूर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. वाङ्मय इतिहासकारांनी तर या साहित्याची साधी दखलही घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळेच वाङ्मयाच्या इतिहासाची पुनर्मांडणी व्हावी ही तळमळ प्रत्येक लेखातून व्यक्त केली. या साहित्यामध्ये वाङ्मयीन मूल्य, कसदारपणा असूनही, या साहित्याची कायम उपेक्षाच झालेली दिसून येते. सत्यशोधकीय लेखन करण्यामध्ये स्त्री वर्गाचाही मोठ्याप्रमाणात वाटा दिसून येतो. वर्चस्ववादी, ब्राह्मण्यवादी व्यवस्थेने स्त्री-शूद्रांचे कसे शोषण केले त्याविषयी सत्यशोधकीय साहित्यातून मोठ्याप्रमाणात प्रकाश पडलेला दिसून येतो. या व्यवस्थेने नेहमीच ब्राह्मणेत्तरांना लाचारपणाची वागणूक दिली, लेखणीच्या बळावर त्यांना निरूपाय केले, प्रसंगी

हातचलाखीसारखे प्रयोगही केले. त्यांना शिक्षण मिळणार नाही अशी समाजव्यस्था निर्माण केली, वेळोवेळी त्यांचा सूड उगविला, दगेबाजी केली, ठकबाजी केली, कावेबाजी केली, इतरांना हलके व ब्राह्मणांना पवित्र मानले यासारख्या प्रकारांमुळे ब्राह्मणेत्तर वर्गाची नेहमीच उपेक्षा होत गेली. त्याना गुलाम म्हणून वागविले. सत्यशोधकीय साहित्यिकांनी या एकूणच शोषणाविरूध्द आपल्या साहित्यातून आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधकीय साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून स्वार्थी, आपमतलबी, पूर्वग्रहदूषित, कपटी, संकुचित विचारांचे खंडण करून, मानवमुक्तीसाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. या साहित्य प्रवाहातून उच्चवर्णियांच्या स्वार्थांधतेचे चित्रण तर आलेले आहेच, परंतु ब्राह्मणेत्तर वर्गाला भटजी, शेटजी यांच्या दास्यातून मुक्त कसे करता येईल हा विचार मोठ्याप्रमाणात रूजविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. हा सत्यशोधकीय साहित्यातील एकूणच विचार नजरेसमोर ठेऊनच डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी प्रस्तुत समीक्षा ग्रंथाचे लिखाण केलेले दिसून येते.

संदर्भ ग्रंथ –

१) सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरूप, डॉ. श्रीराम गुंदेकर, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००३

२) महाराष्ट्राचे शिल्पकार महात्मा जोतिबा फुले, डॉ. श्रीराम गुंदेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र. आ. जुलै २००४

३) सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व, (संपादक– प्राचार्य डॉ. मा.गो.माळी व इतर), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दु.आ. जुलै २००६

✠✠✠

संपादक – डॉ. नरसिंग अप्पासाहेब कदम
एम.ए.,पीएच.डी., नेट
प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

संशोधन कार्य – मराठी ग्रामीण कथेतील दलित जाणिवा

सहभाग – विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग

प्रकाशित ग्रंथ – १. जीवनशैली (चारोळीसंग्रह)
२. निर्भया (कवितासंग्रह)
३. गोंडर (कवितासंग्रह)
४. धडक–बेधडक (वात्रटिका)

सहसंपादक : जागतिकीकरण आणि मराठी साहित्य

संपादकीय सदस्य – लातूर – वसा आणि वारसा

प्रकाशित शोधनिबंध – राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित.

पुरस्कार – साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील विविध पुरस्काराने सन्मानित.

सहसंपादक – प्रा.संजीवकुमार श्रीमंतराव माने
एम.ए.,एम.एड.,नेट
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग
कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय,
उदगीर, जि.लातूर

संशोधन कार्य – 'डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन कार्य चालू आहे.

सहभाग – विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग

प्रकाशित ग्रंथ – १. नयना २. निवडक मराठी व्याकरण

प्रकाशित शोधनिबंध – राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित.

प्रभाकर पब्लिकेशन
३०४, सिद्धीविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर मो. ८६००८८११२७
Website : www.prabhakarpublication.in

ISBN 978-93-92464-69-0
9 789392 464690